# श्री. नितिन धोंडीराम बनकर



**परिस...** नावाच्या काल्पनिक वस्तुचा आपल्या पुराणात, साहित्यात उल्लेख आढळतो, परंतु त्याचा संबंध आल्याचे कुठेही ऐकिवात नाही. परंतु काही व्यक्ती, संस्था याबाबत मात्र सुदैवी असतात. परिस असो अगर नसो, परंतु काही व्यक्तींच्या संस्काररुपी परिस स्पर्शाने त्यांच्या भोवतालच्या व्यक्तींच्या संस्थेच्या आयुष्याचे सोने मात्र होते...... मी देखील त्यातील एक.....**नितीन बनकर..... संचालक, मुंबई जिल्हा मध्यावर्ती सहकारी बँक मर्यादित, संचालक मुंबई जिल्हा हौसिंग फेडरेशन, संचालक बृहन्मुंबई नागरी पतसंस्था फेडरेशन...** इत्यादी सारख्या मुंबई शहरातील नामांकित सहकारी संस्थेवर काम करीत आहे, ते केवळ **'राहूल'** अर्बन पतसंस्थेमुळेच याचा उल्लेख करताना मला अभिमान वाटतो, आणि गेली **२५वर्षे** या परिवाराचा सदस्य असल्यामुळे मी स्वतःला भाग्यवान समजतो.

साधारणतः १९९० डिसेंबरमध्ये मी **'राहूल'** मध्ये कर्मचारी म्हणुन रुजू झालो. आणि माझी सहकार क्षेत्राची वारी सुरु झाली. त्या गोष्टीला **२५ वर्षे** झाली. मागील **२५ वर्षाचे** सिंहावलोकन करताना माझ्या डोळ्यात एकाच वेळी हसु आणि आसु येतात याचे कारण म्हणजे सहकार क्षेत्रातील शिखर संस्थांच्या पदावर मी आजमितीस काम करीत आहे. त्यामुळे जीवनात यश गवसल्याचे हसु आणि ज्या माझ्या मातृसंस्थेमुळे, **'राहूल'** मुळे मला हे यश मिळाले त्या संस्थेला मी थोडा का होईना अंतरलो त्यामुळे येणारे आसु......

महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण झाल्यावर उदारनिर्वाहाचा मोठा यक्ष प्रश्न माझ्यासमोर होता. कौटुंबिक आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे नोकरी किंवा व्यवसाय करणे अपरिहार्य होते. त्याचवेळी कर्मधर्म संयोगाने माझा

सहकार क्षेत्रासमोर मोठ्या आव्हानाचा तो काळ होता, अविश्वासाचे वातावरण होते, अनेक पतसंस्था अडचणी येत होत्या, त्यावेळी **'राहूल'** च्या संचालक मंडळातील **श्री. सहादुशेठ शेरकर, श्री. विश्वास शेरकर, श्री. रामचंद्र ताजणे, श्री.दिनेश लवाणा, श्री. बन्सी राऊत, श्री. सुर्यकांत आळेकर, कै. राजाराम थोरवे, कै. सुलोचना आळेकर** इत्यादींनी संस्था मोठ्या कौशल्याने चालवुन संस्थेची पाळेमुळे घट्ट रोवण्याचा प्रयत्न केला.... मला आठवतय आपल्या संस्थेचे मुख्याधिकारी **श्री.राजेंद्र चौधरी साहेब 'राहूल'** च्या स्थापनेपासुनच्या प्रत्येक घडामोडीचे साक्षीदार आहोत.

कालांतराने अनेक स्थित्यांतरे **'राहूल'** च्या आयुष्यात आली, काही जुने संचालक जावुन **श्री. चंद्रकांत तलाजिया, श्री. भवानीशंकर शेट्टी, श्री.संजय भुजबळ, श्री.बाजीराव थोरवे, श्री. हरिश्चंद्र जगताप, कै. संजय कारभारी राऊत श्री.गंगाधर जगताप, श्री.अनिल सांगळे, श्री. दिपक थोरवे आणि श्री. बाळासाहेब एरंडे** यांच्यासारखी नव्या विचारसणीची मंडळी संचालक मंडळावर आली, आणि **'राहूल'** ने प्रगतीचे अनेक टप्पे यशस्वीपणे पार पाडले.

जुने गेले, नवे आले पण आम्ही चौघे म्हणजेच **श्री. सहादु शेरकर, श्री. शंकर भुजबळ, दिनेश नाईक आणि मी** मात्र एका विचाराने, एका ध्येयाने झपाटुन **'राहूल'** ची प्रगती करण्यासाठी कंबर कसली आणि मला आठवते की, **श्री. शेरकर व श्री. भुजबळ** जोडीने नेहमी **'व्यक्तीपेक्षा संस्था श्रेष्ठ'** या न्यायाने संस्था चालविताना आपले नातेवाईक व मित्रमंडळी यांचा प्रसंगी कितीतरी वेळा रोष ओढवुन घेतला. माझ्यात असलेल्या संस्थेच्या **स्वामित्वामुळे** माझी विण या दोघांशी अगदी घट्ट जुळली, ती आजपर्यंत. माझ्या

माझ्यावर अगदी पुत्रवत प्रेम केले हे मी कधीही विसरु शकणार नाही.

**श्री. चौधरी साहेब** आणि **'राहूल'** चे सर्व कर्मचारी व दैनंदिन एजंट, सल्लागार मंडळ, शाखा कमिटी सदस्य यांनी देखील माझ्या सहकारी जीवनात मला साथ दिली त्यामुळे त्यांचे देखील मी या ठिकाणी ऋण व्यक्त करतो.

संस्थेच्या जीवन प्रवासामध्ये प्रवास करीत असताना काही संचालक मंडळ सदस्य, कर्मचारी वर्ग, सभासद, ठेवीदार, हितचिंतक,आपली आकस्मितपणे साथ सोडुन अनंतात विलीन झाले त्यांचे पुण्यस्मरण मी या ठिकाणी करुन त्यांना आदरांजली वाहतो.

**फोडिले भांडार, धन्याच्या हा माल।**
**मी तो हमाल भारवाही।।**

**तुकोबारायांच्या या उक्तीप्रमाणे**, मी **'राहूल'** मध्ये कर्मचारी असून देखील **'राहूल'** च्या संचालक मंडळाने मला संस्था चालविण्याचे संपुर्ण स्वातंत्र्य दिले होते. त्यामुळे मला संस्था चालविताना काही अडचण आली नाही, किंबहुना त्यामुळेच माझे व्यक्तिमत्व आकार घेऊ लागले. दैनंदिन वसुली एजंट, लिपीक, लेखापाल, व्यवस्थापक, महाव्यवस्थापक नंतर याच संस्थेचा संचालक, सेक्रेटरी अशा विविध भुमिका मला **'राहूल'** मध्ये करता आल्या त्याचा उपयोग पुढे **जिल्हा बँकेत संचालक, उपाध्यक्ष** तसेच इतर शिखर संस्थेमध्ये काम करताना मला झाला.

माझा स्वभाव थोडासा बंडखोर. त्यामुळे माझे संचालक मंडळाबरोबर नेहमी वैचारिक वाद होत असत, आणि अज्ञानाने कितीतरी वेळा **'राहूल'** चा राजीनामा देखील देण्याचा मुर्खपणा केला होता. परंतु **श्री. शेरकर, श्री. भुजबळ** व इतर मंडळींनी माझ्या आज्ञानावर पांघरुन घालुन मोठ्या मायेने मला सांभाळुन घेतले. म्हणुन त्यांच्याबद्दल आजही माझ्या मनात आदाराची भावना आहे, आणि ती यापुढेही राहील याबाबत जरासुध्दा शंका नाही.

आपल्या **'राहूल'** ने सख्यात्मक वाढ केली आहे आणि गुणात्मक वाढदेखील केली आहे. **'राहूल'** ३० हजार वरुन ३० कोटीवर केव्हा गेली हे कळलेच नाही. ७ शाखा कार्यरत झाल्याचे पाहुन मनाला खुप आनंद वाटतो. **'राहूल'** च्या यशात आपला देखील खारीचा वाटा आहे, असे वाटणे मला अतिशय सुखावह वाटते.

आज **'राहूल'** अतिशय सुसज्जपणे आणि सक्षमपणे चालली आहे याचे श्रेय अर्थातच राहुल चे **संचालक मंडळ, सचिव श्री. बाजीराव थोरवे साहेब** यांच्या व्यवसायिक दृष्टीकोनातुन आणि कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमातुनच, याचा या ठिकाणी प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो.

माझ्या वैयक्तिक जीवनात देखील **'राहूल'** चे स्थान अतिशय अढळ आहे. **'राहूल'** ने माझे केवळ करियर घडवले नाही तर मला माझी जीवनसंगिनी देखील **'राहूल'** मुळेच मिळाली आहे. त्यामुळे मी राहुल माझे घर समजतो. आयुष्यात कोठेही, कोणतेही काम करत असेन, कोणत्याही पदावर काम करत असेन पण माझे लक्ष मात्र **'राहूल'** वर असेल. कारण **'राहूल'** ने माझ्यातील सहकारी कार्यकार्त्याला जन्म दिला, म्हणजेच **'राहूल'** माझी मातृसंस्था आहे....आणि लेकरु कितीही मोठे झाले तरी आईपेक्षा कधीही मोठे होत नाही. म्हणुन माझा **'राहूल'** परिवारातील प्रत्येक सदस्याला मनापासुन सलाम.

**'राहूल'** ची आणि **'राहूल'** परिवारातील प्रत्येक सदस्याची जीवनात चौफेर प्रगती होवो अशी सदिच्छा या ठिकाणी मी व्यक्त करतो.....आणि अजाणतेपणी कोणाचा नामोल्लेख करायचा राहीला असेल तर त्यांची माफी मागुन त्यांचे देखील ऋण याठिकाणी मी व्यक्त करतो.

यापुढेही मला **'राहूल'** ची सेवा करता यावी अशी त्या सर्वश्रेष्ठ परमेश्वराकडे व श्री साईनाथांकडे विनंती करुन मी या ठिकाणी पुर्णविराम करतो.

धन्यवाद

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार!!!

**श्री. नितिन धोंडीराम बनकर**
संचालक, मुंबई, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,
संचालक, मुंबई जिल्हा हौसिंग फेडरेशन,
संचालक, बृहन्मुंबई नागरी पतसंस्था फेडरेशन
संचालक, राहुल अर्बन को.ऑप.क्रे.सोसा.लि.